## सी.एन.आर.क्र. एम.एच.डी.एच.०४०००५३७२०१९

## फौ. कि. अर्ज क्र. ७/२०१९ मधील निशाणी ४१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज जाबदेणार क्र. १ ते ३ तर्फे त्यांचे विरुद्ध पारित झालेला 'विना उलटतपास' चा आदेश रद्द होऊन त्यांना अर्जदाराचा उलटतपास घेण्यास परवानगी मिळावी याकरीता केलेला आहे.

०२) उभय पक्षांतर्फे सादर करण्यात आलेला युक्तिवाद ऐकला. अर्ज व त्यावरील अर्जदाराचे सविस्तर म्हणणे यांचे अवलोकन केले. तसेच, प्रस्तुत प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले.

०३) अभिलेखाचे अवलोकनकरीता असे दिसून येते की, अर्जदार हिचे सरतपासाचे शपथपत्र (नि. क्र. २२) दाखल करण्यात आले होते. परंतु, जाबदेणार क्र. १ ते ३ यांचेतर्फे अर्जदाराचा उलटतपास न घेतल्याने त्यांचेविरुध्द सदर साक्षीदाराबाबत 'उलटतपास नाही' चा आदेश दि. १९.१२.२०२२ रोजी पारित करण्यात आला होता. प्रस्तुत अर्जामध्ये जाबदेणारतर्फे देण्यात आलेली कारणे म्हणजेच आदेश झाल्याचे दिवशी जाबदेणार क्र. १ हा पोलीस विभागात मुंबई येथील मिरा–भाईंदर येथे पोलीस मुख्यालयाला नियुक्त आहे. तसेच, जाबदेणार क्र. २ यांचे वय–७५ वर्ष असुन, जाबदेणार क्र. ३ हिचे वय– ७० वर्ष आहे. तसेच अर्जदार ही जाबदेणार यांच्याशी मा. न्यायालयात वाद करुन भांडण, मारठोक व शिवीगाळ केली आहे. अर्जदार व तिच्या नातेवाईकांच्या वागणुकीमुळे जाबदेणार याच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे ही पुर्णतः पुरेशी व संयुक्तीक नाहीत. परंतु, असे असले तरीही, न्यायाचे कारणास्तव प्रस्तुत अर्जाच्या

गुणदोषावर कायमपणे निकाल होण्याकरिता, जाबदेणार क्र. १ ते ३ यांना अर्जदाराचा उलटतपास घेण्याची संधी देणे आवश्यक आहे असे माझे मत आहे. नैसर्गिक न्यायतत्वांच्या दृष्टिकोनातुन विचार केल्यास, जाबदेणार क्र. १ ते ३ यांना अर्जदाराचा उलटतपास घेण्याची संधी देणे हे न्यायदानाच्या दृष्टीने अपरिहार्य ठरते. जाबदेणार क्र. १ ते ३ यांना तशी संधी दिल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता दिसून येत नाही. उलटपक्षी, अर्ज कायमपणे गुणदोषांवर निकाली होण्यास मदतच होईल व निष्कारण न्यायालयीन प्रकरणांची गुंतागुंत देखील वाढणार नाही. अर्जदारास विलंबामुळे होणाऱ्या त्रासाचा विचार करता तिला योग्य तो खर्च देवून न्यायाचा समतोल राखता येईल. सबब, मी वरील चर्चित कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे :–

## – : आदेश :–

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. जाबदेणार क्र. १ ते ३ यांनी प्रत्येकी अर्जदारांना रु.१०००/– (रुपये एक हजार फक्त) इतकी रक्कम खर्च म्हणून पुढील नेमले तारखेस अथवा तत्पुर्वी द्यावी.

३. सदर खर्चाची रक्कम जाबदेणार क्र. १ ते ३ यांनी अर्जदारांस वर म्हणल्याप्रमाणे दिल्यानंतर, जाबदेणार यांना अर्जदार क्र. १ हिचा उलटतपास घेण्याची संधी देण्यात येईल.

४. अर्जदार क्र. १ हिने उलटतपासाकरीता न्यायालयामध्ये पुढील नेमले तारखेस हजर रहावे.

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.04.06 17:13:56 +0530

स्थळ : दोंडाईचा
दिनांक : ०६/०४/२०२६

आदित्य घ. नाईक
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर),
दोंडाईचा

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | गणेश साईनाथ अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | - | दिवाणी न्यायालय क.स्तर, दोंडाईचा. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - | ०६.०४.२०२६. |

स्वाक्षरित/-
लघुलेखक (श्रेणी-३)